| MHKO070007762021 | नियमित दिवाणी दावा क्र.१२९/२०२१ मधील<br>नि.क्र.१५८ वरील आदेश<br>बेबीताई पाटील<br>विरुध्द<br>सुवर्णा आलमाने आणि इतर |
|---|---|

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अबेटमेंटचा आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरचे काम प्रलंबीत असताना यातील प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील हे ता.११/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना एक मुलगा व दोन मुली असे सरळ कायदेशीर वारस आहेत. दावा स्थावर मिळकतीच्या संदर्भात असून प्रस्तुत प्रतिवादी क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. पासगोंडा देवगोंडा पाटील हे मयत झालेची माहिती वादी यांना नव्हती. त्यानंतर प्रतिवादी तर्फे ता.०८/०२/२०२४ रोजी प्रवितादी क्र.१२ हे मयत झालेबाबतची पुरसीस दाखल केली. त्यावेळी वादी यांना प्रतिवादी क्र.१२ हे मयत झालेचे समजले. त्यानंतर प्रतिवादी क्र.१२ यांच्या वारसांची माहिती घेणेस कालावधी लागला, तसेच माहिती घेवून वेळेत वकीलांची भेट घेता आली नाही. तसेच प्रस्तुत वादी यांना कोर्ट प्रोसिजरची माहिती नसल्याने मुदतीत वारसांची तजवीज करता आली नाही. तद्नंतर प्रस्तुत वारंसाची माहिती मिळाल्याने आजरोजी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज दाखल करत आहेत. सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेने सदरकामी अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदरचा झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत कामाचा पुर्णपणे गुणदोषावर निकाल होणार आहे. सबब वादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द होऊन मिळावा व प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस रकॉर्डवर आणणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. मयत प्रतिवादी क्र.१२ च्या वारसांमार्फत वादीच्या अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जास असे म्हणणे दिले आहे की, सदरचा अर्ज कायदयाने चालण्यास पात्र नाही. अर्जात कोणतेही संयुक्तीक व पुरेसे कारण अर्जात नमुद नाही. वारस रेकॉर्डवर घेणे का आवश्यक आहे याचे कोणतेही कारण अर्जात नमुद नाही. वरील सर्व कारणास्तव अर्ज नामंजुर करणेत यावा. जर मे. कोर्ट अर्ज मंजुर करावयाच्या मतापर्यंत आलेस वादीस जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे. इतर प्रतिवादींतर्फे वादीच्या अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जास म्हणणे दिले नसल्यामुळे सदरचा अर्ज इतर प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला.

०४. विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत निशाणी क्र.१५५/१ सोबत दाखल केलेली आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन करता मयत प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील यांचा मृत्यू दि.११/०२/२०२३ रोजी झाल्याचे दिसुन येते. मयत प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील हे दि.११/०२/२०२३ रोजी मयत झाले तारखेपासून ९० दिवसांमध्ये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतू वादी यांनी प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस प्रतिवादी यांच्या मृत्युनंतर ९० दिवसांत आणले नसल्यामुळे प्रस्तुतचा दावा अबेट झाला आहे. वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब दाखविण्यासाठी त्यांना प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा पाटील हे मयत झाल्याची माहिती प्रतिवादीतर्फे दि.०८/०२/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१२ हे मयत झालेबाबतची पुरसीस दाखल केल्यानंतरच माहिती झाले. तसेच त्यांच्या वारसांची माहिती घेणेस कालावधी लागला, तसेच माहिती घेवून वेळेत वकीलांची भेट घेता आली नाही. तसेच प्रस्तुत वादी यांना कोर्ट प्रोसिजरची माहिती नसल्याने मुदतीत वारसांची तजवीज करता आली नाही. त्यानंतर वादी यांनी दि.१३/०६/२०२४ रोजी सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केला. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भातील असल्यामुळे

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचा महत्वपूर्ण हक्क नाकारल्यासारखे होईल. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते –

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज (नि.१५८) र.रु.२००/–(रुपये दोनशे फक्त) खर्च म्हणून न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पूर्तता केल्यानंतर मयत प्रतिवादी क्र.१२ पासगोंडा देवगोंडा पाटील यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द समजण्यात यावा.

VANITA Digitally signed by VANITA Date: 2025.02.20 17:21:42 +0530

**( व्ही.एम.कोळेकर )**

दि.२०/०२/२०२५

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर.